# मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई.

मध्यवर्ती सुविधा इमारत, तिसरा माळा,
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.

# उपविधी

( दिनांक ३१-१२-९७ अखेर सुधारीत )

किंमत ३५ रुपयें

# प्रारंभिक

महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी – विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ च्या ६१व्या कलमान्वये आणि महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी – विक्री (नियमन) नियम, १९६७ यास पात्र राहून मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईचे केलेले उपविधी.

(अ) व्याख्या

**१. बाजार समितीचे नांव :**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी – विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३-१अ चे पोट कलम (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे "मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती" असे आहे व समितीचा पत्ता मध्यवर्ती सुविधा इमारत, ३रा माळा, तुर्भे, नवी मुंबई – ४०० ७०३ असा आहे.

व्याख्या :

२) "संचालक" संज्ञेचा अर्थ पणन संचालक, महाराष्ट्र राज्य असा समजावा. या उपनिदेश विषयात अगर संदर्भात कोणतीही बाधा येत नसेल तर

"अधिनियम" या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी – विक्री (नियमन) अधिनियम १९६३ असा समजावा.

"नियम" या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी – विक्री (नियमन) नियम १९६७ असा समजावा.

"उपविधी" या संज्ञेचा अर्थ मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईचे उपविधी असा समजावा.

"बाजार क्षेत्र" या संज्ञेचा अर्थ परिशिष्ट – क्र. २ अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ता. १४-१-१९७७ मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रसिद्ध केलेली अधिसूचना क्र. सीएम्आर/ आर / मुंबई -७७ मध्ये निर्दिष्ट केलेले क्षेत्र असे समजावे. तसेच मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यापुढे वेळोवेळी जे बाजार क्षेत्र जाहीर करतील ते क्षेत्र बाजार क्षेत्र समजावे.

"मुख्य बाजार" या संज्ञेचा अर्थ परिशिष्ट क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ता. २५.१.७७ व १८.१०.८८ रोजी मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रसिद्ध केलेली अधिसूचना क्र. सीएम्आर / आर / १२ मुंबई, नुसार जाहीर केलेले स्थान असा समजावा. तसेच मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यापुढे बाजार समितीच्या शिफारशीनुसार जाहीर करतील ते मुख्य बाजार आवार समजावे.

"दुय्यम बाजार" या संज्ञेचा अर्थ परिशिष्ट क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ता. २५-१-७७ रोजी. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रसिद्ध केलेली अधिसूचना क्र. सीएम्आर/ आर / १२ /

मुंबई, नुसार जाहीर केलेले स्थान असा समजावा. तसेच मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे बाजार समितीच्या शिफारशीनुसार वेळोवेळी जाहीर करतील ते दुय्यम बाजार समजावे.

''परिशिष्ट'' या संज्ञेचाअर्थ या उपविधीत समाविष्ट क्र. १ ते २२हे परिशिष्ट समजावे.

''शेतीचा माल'' या संज्ञेचा अर्थ परिशिष्ट क्र. १अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ता. १४-१-७७ व दि. २०-६-८८ रोजी मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रसिद्ध केलेली अधिसूचना क्र. सीएमआर / आर १२ मध्ये नमुद केलेला शेतीमाल असा समजावा.

''बाजार समिती'' या संज्ञेचा अर्थ वरील उपविधी २ (५) यांत उल्लेख केलेले बाजार क्षेत्र यासाठी अधिनियम कलम ११ अन्वये स्थापन केल्याप्रमाणे मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई असा समजावा.

''अनुज्ञप्तिधारी'' या संज्ञेचा अर्थ मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईने दिलेली नियम ६ किंवा ७ अन्वये असलेली अनुज्ञप्ति जी कोणताही इसम धारण करीत असेल तो इसम असा समजावा.

महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी - विक्री (नियमन) अधिनियम १९६३ व त्या अन्वये केलेल्या नियमांत जे शब्द व संज्ञा वापरल्या आहेत व उपविधीत त्यांच्या व्याख्या दिलेल्या नाहीत अशा शब्दांना व संज्ञांना अधिनियमात व नियमात त्यांचे अर्थ दिलेले असतील तेच अर्थ असतील.

''सुकामेवा'' या संज्ञेचा अर्थ शेतीमालाच्या प्रकारात बदाम, अंजीर, खारीक, जर्दाळू, काजू, काळी मनुका, पिस्ता, सुकी केळी, मनूका, आक्रोड, बेदाणे, चारोळी या पदार्थांचा समावेश होतो.

## (ब) अनुज्ञप्ति

### ३. अनुज्ञप्ति मागणीबाबत :

बाजार समिती कडून नियम ६ किंवा ७ खाली अनुज्ञप्ति घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिनी जरूर ती अनुज्ञप्ती मिळण्यासाठी या उपविधी सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक २ किंवा ३ अन्वये ठरवून दिलेल्या नमुन्यात व नूतनीकरण करण्यासाठी परिशिष्ट क्रमांक २ (अ) अन्वये ठरवून दिलेल्या नमुन्यात अर्ज केले पाहिजेत.

३. अ) १. नियम ६ प्रमाणे दरवर्षी अनुज्ञप्ति नूतनीकरण करून घेण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट पूर्वी अर्ज सादर केले पाहीजेत. ३१ ऑगस्ट नंतर येणाऱ्या अर्जावर अनुज्ञप्तिच्या १० टक्के प्रतिदिनी विलंब शुल्क घेऊन अर्ज स्विकारणे हे बाजार समितीच्या अधिकार कक्षांत राहील.

२. बाजार समितीकडून नियम ६ खालील दिलेल्या नवीन किंवा नुतनीकरण केलेली अनुज्ञप्ति एक किंवा तीन बाजार वर्ष जरी मान्यता असेल त्या कालावधीसाठी राहील. अनुज्ञप्तिसाठी एकाच वेळेस एकूण रक्कम तीन बाजार वर्षाकरीतां नविन किंवा नूतनीकरणाच्या एकमुक्त तीन वर्षाची अनुज्ञप्तिची

रक्कम भरणा करून अर्ज करता येईल.

मात्र तीन वर्षासाठी दिलेली नवीन किंवा नूतनीकरण / अनुज्ञप्ति अनुज्ञप्तिधारींनी प्रतिवर्षी केलेला धंदा बाजार समितीने दिलेल्या किंवा देय असलेल्या रक्कमांचा तपशील. याबाबत बाजार समितीच्या छाननीच्या अधीन राहील.

३.ब) नियम क्रमांक ७ च्या अधिनतेने धारण केलेल्या अनुज्ञप्तिचा कालावधी संपुष्टात येण्यापूर्वीच्या ३१ ऑगस्ट पूर्वी अनुज्ञप्तिधारींनी नुतनीकरणासाठी अर्ज करावयास पाहिजे. ३१ ऑगस्टनंतर केलेल्या अर्जाबाबत प्रतिदिन १/- रूपया विलंब शुल्क आकारले जाईल व असे विलंब शुल्के सहीत आलेले अर्ज स्विकारणे हे बाजार समितीच्या अधिकार कक्षांत राहील.

४. अनुज्ञप्ति फी :

१) मुख्य किंवा दुय्यम बाजार किंवा बाजार क्षेत्रात अन्य ठिकाणी शेती उत्पन्नाची खरेदी - विक्री व इतर अन्य संबंधीत व्यवहार करू इच्छीणाऱ्या व्यक्ती यांनी नियम क्रमांक ६ व ७ यास पात्र राहून खाली नमूद केलेल्या दराने बाजाराच्या प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञप्ति फीची संपूर्ण रक्कम अर्जासोबत बाजार समितीकडे भरली पाहीजे.

''मुख्य बाजार व प्रत्येक दुय्यम बाजार यासाठी वेगवेगळी ठरवून दिलेल्या दराने अनुज्ञप्ति फी अडत्यास भरावी लागेल.''

२) अनुज्ञप्ति फी चे दर :

| अनु. क्र. | अनुज्ञप्तिचा प्रकार | व्यवहाराची व्याप्ती | अनुज्ञप्ति फीचे वार्षिक दर रू. | अनुज्ञप्ति नुतनीकरण फीचा वा. दर रू. |
|---|---|---|---|---|
| १. | अडत्या | | रू. १००/- | रू. ९०/- |
| २. | निर्यातदार | | रू. १००/- | रू. ९०/- |
| ३. | व्यापारी वर्ग अ | रू. ५० हजारपेक्षा अधिक वार्षिक व्यवहार करणे | रू. १००/- | रू. ९०/- |
| | व्यापारी वर्ग ब | रू. २५ हजार ते ५० हजारापर्यंत व्यवहार करणे | रू. १००/- | रू. ९०/- |
| | व्यापारी वर्ग क | रू. १० हजार ते २५ हजारापर्यंत व्यवहार करणे | रू. ५०/- | रू. ४०/- |
| | व्यापारी वर्ग ड | रू. १० हजारापर्यंत वार्षिक व्यवहार करणे | रू. २०/- | रू. १८/- |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४. | प्रक्रिया करणारे | | रू. १००/- | रू. ९०/- |
| ५. | दलाल | | रू. ८०/- | रू. ७०/- |
| ६. | सर्वेक्षक | | रू. ३०/- | रू. २८/- |
| ७. | तोलणार/मापणार | | रू. १०/- | रू. ८/- |
| ८. | वखारवाला | | रू. ३०/- | रू. २८/- |
| ९. | गाडीभाडे आणि वटवणी अभिकर्ता | | रू. ४०/- | रू. ३८/- |
| | अ) वाहतूकदार | | रू. १०/- | रू. ८/- |
| १०. | अडत्या, व्यापारी, दलाल प्रक्रिया करणार यांचे मदतनिस | | रू. १०/- | रू. ८/- |
| ११. | गाडीभाडे व वटवणी अभिकर्ता यांचे मदतनीस | | रू. ६/- | रू. ४/- |
| १२. | गुदामधारक | | रू. ६/- | रू. ४/- |
| १३. | हमाल | | रू. ६/- | रू. ४/- |
| १४. | इतर | | रू. १०/- | रू. ८/- |

**४) अनुज्ञप्ति फी परत करणे**

अनुज्ञप्ति मंजूर करण्यापूर्वी अर्जदाराने अनुज्ञप्ति घेण्याची इच्छा नसल्याबद्दल लेखी कळविले असलेखेरीज करून; नियम ६ (४) व ७ (६) यांस पात्र राहून कोणत्याही परिस्थितीत एकदा भरलेली अनुज्ञप्ति फीची रक्कम परत केली जाणार नाही.

**५. जामिनकीची व करारनाम्याची पूर्तता करणे :**

नियम ६ अन्वये अनुज्ञप्ति मिळणेसाठी सादर केलेल्या अर्जासोबत बाजार समितीकडून वेळोवेळी ठरविण्यात येईल इतक्या रकमेचे बँकेचे किंवा परिशिष्ट क्र. १७ चे नमुन्यात त्रयस्त इसमाचे इमीपत्र जोडले पाहिजे किंवा तितकी रोख रक्कम भरली पाहिजे किंवा सक्षम अधिपतदारी प्रमाणपत्र (Solvency Certificate) जोडले पाहिजे.

खालीलप्रमाणे जामीन घेण्यात यावा.

| क्रमांक | अनुज्ञप्ति प्रकार | जामिनकीची रक्कम |
|---|---|---|
| | अडत्या | |
| अ) | कांदा-बटाटा व शेतमालाचा व्यापार करणारे | २५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ब) | फळे व ऊस या शेतीमालाचा व्यवहार करणारे | १५,०००/- |
| क) | भाजीपाला या शेतीमालाचा व्यवहार करणारे | १०,०००/- |
| ड) | खालील नमूद केलेले धान्य या शेतीमालाचा व्यवहार करणारे<br>१) गहू (साले न काढलेला व काढलेला), २) भात (साले काढलेला व न काढलेला), ३) ज्वारी ४) बाजरी ५) मका ६) सरसव ७) बार्ली ८) सावी ९) नागली १०) वरी ११) कोद्रा १२) बावटो १३) नांटो १४) विनो १५) नवानी. | २५,०००/- |
| इ) | खालील नमूद केलेले कडधान्य या शेतीमालाचा व्यवहार करणारे<br>१) तूर २) चना ३) उडीद ४) मूग ५) वाल ६) छोला ७) मटकी ८) वाटाणे ९) कुळीथ १०) डाळी (सर्व कडधान्यांच्या डाळी) ११) मसूर १२) घेवडा बी १३) लांग (लाख) | २५,०००/- |
| फ) | खालील नमूद केलेले तेलबिया या शेतीमालाचा व्यवहार करणारे<br>१) भुईमूग (टरफलासह व शेंगदाणे), २) जवस ३) तीळ ४) करडई ५) अंबाडी ६) नारळ ७) सरकी ८) एरंडी ९) खुसराणी १०) निगर सिडस् ११) थायमॉल (अवजन बी) १२) शेषा १३) गूळ १४) साखर | २५,०००/- |
| ज) | प्राणीजन्य या शेतमालाचा व्यवहार करणारे<br>१) तूप | २५,०००/- |
| ह) | खालील नमूद केलेले मसाल्याचे पदार्थ या शेतीमालाचा व्यवहार करणारे<br>१) हळद २) आले ३) लसूण ४) धने ५) वेलदोडे ६) मिरची ७) बरीअली ८) सुपारी (पोफळी) ९) काजू १०) जिरे ११) राई (मोहरी) १२) मेथी १३) हिंग १४) चिंच १५) विड्याची पाने. | २५,०००/- |
| ळ) | आटा व गव्हाचे पीठ या शेतमालाचा व्यवहार करणारे | २५,०००/- |
| क्ष) | सुकामेवा या शेतमालाचा व्यवहार करणारे | २५,०००/- |
| ज्ञ) | खाद्यतेल या शेतमालाचा व्यवहार करणारे | २५,०००/- |

२) व्यापारी

| | | | |
|---|---|---|---|
| 'अ' वर्ग व्यापारी - | २५,०००/- | 'ब' वर्ग व्यापारी - | १२,०००/- |
| 'क' वर्ग व्यापारी - | ५,०००/- | 'ड' वर्ग व्यापारी - | २,५००/- |

त्रयस्त इसमाची हमी या स्वरूपाची जामीन दिल्यास अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्रास प्रचलित नियमानुसार योग्य त्या रकमेचे हमी मुद्रांकन असले पाहिजे.

२) नियम ६ किंवा ७ खाली अनुज्ञप्ती मंजूर केल्याचे बाजार समितीकडून अर्जदारास कळविण्यात आल्यानंतर या उपविधी सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक ४, ५, ६ किंवा ७ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे आवश्यक तो मुद्रांकित करारनामा स्वखर्चाने करून दिल्याखेरीज अनुज्ञप्ती मिळणार नाही. मात्र अनुज्ञप्तीचे

नूतनीकरणाच्या बाबतीत असा मुद्रांकित करारनामा परत करून देण्याची आवश्यकता असणार नाही व अशा बाबतीत पूर्वी करून दिलेला करारनामाच अस्तित्वात राहील.

६. **अनुज्ञप्तिस मान्यता देणे :**

कायदा, नियम व पोट नियमातील सर्व संबंधीत तरतूदींची पूर्तता झाल्याची खात्री झाल्यावर बाजार समिती मुख्य बाजार व प्रत्येक दुय्यम बाजार यासाठी वेगवेगळी अनुज्ञप्ति देईल. अनुज्ञप्ति मंजूर केल्याबद्दलचे पत्र परिशिष्ट क्रमांक १५ प्रमाणे असेल.

७. **अनुज्ञप्ति वर्ग करणे :**

कनिष्ठ प्रतीची अनुज्ञप्ति वरिष्ठ प्रतीत वर्ग करावयाची असल्यास अनुज्ञप्ति फी मधील फरकाची रक्कम व तबदील फी रू. ५.०० भरून वरिष्ठ प्रतिच्या अनुज्ञप्तिच्या अटींची पूर्तता केल्यानंतर, वरिष्ठ प्रतीत वर्ग करता येईल.

८. **अनुज्ञप्तिची दुसरी प्रत देणे :**

अनुज्ञप्ति हरवली, नष्ट अगर गहाळ झाली वगैरे बाबतीत अनुज्ञप्तिधारीने बाजार समितीकडे ताबडतोब खबर दिली पाहिजे. अनुज्ञप्तिधारीने तो अनुज्ञप्ति हेतुपुरस्सर हरवली, नष्ट अगर गहाळ केली नाही, अशी खात्री झाल्यावर बाजार समिती ठरविल त्याप्रमाणे, मात्र जास्तीत जास्त रू. २५.०० भरल्यावर अनुज्ञप्तिची दुसरी प्रत देण्यात येईल व अशा प्रतीवर ''दुसरी प्रत'' असा शब्द लिहिलेला असेल.

९. **बिल्ले व ओळखपत्रांचा वापर करणे :**

१) प्रत्येक व्यापारी, मदतनीस, तोलणार/मापणार, हमाल किंवा आवश्यक वाटतील असे अन्य अनुज्ञप्तिधारी यांनी बाजार समितीने पुरविलेला अधिकृत बिल्ला अगर ओळखपत्र यांचा वापर केला पाहिजे. सदर बिल्ला किंवा ओळखपत्र प्रथम बाजार समितीकडून विनामूल्य पुरविले जाईल.

२) उपविधी ९ (१) प्रमाणे बाजार समितीकडून पुरविण्यात आलेले ओळखचिन्ह अगर ओळखपत्र हरविले, अगर गहाळ झाले अथवा अन्य कारणाने खराब झाले असेल तर संबंधीतांनी बाजार समितीत ताबडतोब कळविले पाहिजे. म्हणजे त्यांना बाजार समितीकडून नवीन बिल्ला किंवा ओळखपत्र रू. २५.०० फी घेऊन देण्यात येईल.

३. ज्या अनुज्ञप्तिसंबंधी असा बिल्ला अगर ओळखपत्र दिलेले आहे त्याचा अनुज्ञप्तिधारीने फक्त वापर केला पाहिजे त्याखेरीज बाजारक्षेत्रात कोठेही त्यास काम करता येणार नाही. असा बिल्ला किंवा ओळखपत्र कोणत्याही बाबतीत तबदील करता येणार नाही. या उपविधीचा भंग केल्यास अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द केली जाण्यास पात्र राहील.

४. बाजार समितीने अनुज्ञप्तिधारीस दिलेला बिल्ला अगर ओळखपत्र अशा अनुज्ञप्तिधारीने अनुज्ञप्तिचे नुतनीकरण न केल्यास बाजार समितीस सुस्थितीत ताबडतोब परत केले पाहिजे. तसे न केल्यास अनुज्ञप्तिधारी शिक्षेस पात्र राहील.

## १०. अनुज्ञप्तिधारीने ठेवावयाची कागदपत्रे, त्याच्या किंमती व तपासणी :

१) बाजार किंवा बाजार क्षेत्रात काम करणारे अडते, व्यापारी हुंडेकरी, दलाल प्रक्रिया करणारे, निर्यातदार, तोलणार, मापणार व इतर अनुज्ञप्तिधारी, यांनी बाजार समिती वेळोवळी ठरविल त्या पद्धती व नमुन्याप्रमाणे कागदपत्रे, नोंदवह्या, जमा-खर्चाच्या वह्या खरेदी, विक्री, साठा वह्या, हिशेबपट्टी, काटापट्टी, दैनिक तोलाई पत्रक, बिल पुस्तके लिलाव नोंद पुस्तके, फॉ प्रपत्रे माहिती पत्रके वगैरे टेवली पाहिजेत.

२) बाजार समितीकडून अनुज्ञप्तिधारीना पुरविण्यात येणारी सर्वप्रकारची प्रपत्रे नोंदवह्या, पुस्तके, माहितीपत्रके वगैरेच्या किंमती बाजार समिती ठरविल त्याप्रमाणे असतील.

३) उपविधी १० (१) नुसार ठेवण्यात आलेल्या अभिलेखातील, बाजार समितीकडून विचारण्यात, आलेली नित्य किंवा नैमित्तिक माहिती बाजार समितीस अनुज्ञप्तिधारीने पुरविली पाहीजे.

४) सभापती किंवा सचिव किंवा बाजार समितीने याबाबतीत अधिकार दिलेल्या अन्य सेवकाने मागणी केली असता अनुज्ञप्तिधारीने कागदपत्रे तपासणीसाती सादर केली पाहिजेत. तसेच त्याच्या व्यवसायाच्या सर्व ठिकाणी प्रवेश - करून तपासणी करू दिली पाहिजे.

५) उपविधी १० (४) चे कारणाकरिता सभापती, सचिव किंवा बाजार समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या सेवकास -

अ) अनुज्ञप्तिधारीचे कोणत्याही व्यवसायाचे ठिकाणी प्रवेश करण्याचा,

ब) कोणत्याही कागदपत्र वह्या, नोंदवह्या तपासण्याचा व त्यातील कोणत्याही मजकुराची नक्कल करून घेण्याचा अगर मागण्याचा,

क) बाजार किंवा बाजारक्षेत्रातून बाहेर जाणाऱ्या अथवा बाज.र किंवा बाजार क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या कोणत्याही वाहनास थांबविण्याचा, त्यातील माल, वस्तू पाहण्याचा अधिकार असेल.

६) अशा तपासणीचे काम हे तपासणी चालू असलेल्या बाबीसंबंधी माहिती मिळण्यापुरतेच मर्यादित असले पाहिजे आणि अशा रितीने मिळविलेली माहिती बाजार समितीच्या कायदेशीर कारणाकरिताच उपयोगात आणली पाहिजे.

## ११. अनुज्ञप्तिधारीची वर्तणूक :

१. कोणत्याही अनुज्ञप्तिधारीने कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी बाजारक्षेत्रात जाहीर केलेल्या शेती माला संबंधीत व्यवहार करता कामा नये.

२) उपविधी ११ (१) चे कारणाकरिता अधिकृत इसम म्हणजे बाजार समितीचे अनुज्ञप्तिधारी, त्यांचे मदतनीस व माल विक्रेते हे समजण्यात यावेत.

३) कोणत्याही अडत्याने किंवा कोणत्याही खरेदीदाराने कोणत्याही अनुज्ञप्तिधारी तोलणारा, मापणारा सर्वेक्षक यांना आपल्या नोकरीत घेता किंवा चालू ठेवता कामा नये किंवा ठरवून दिलेल्या बाजार आकाराचे दरापेक्षा जादा रक्कम पैशाचे किंवा अन्य रूपाने देता कामा नये.

४) तोलणाऱ्यांनी व मापणारांनी आवश्यक असेल त्याप्रमाणे व आवश्यक असेल तेव्हा बाजार समिती

तोल व मोजमाप करण्यासंबंधीची, जी पद्धत व रीत अंमलात आणील किंवा ठरवील त्या पद्धतीने व रितीने वागण्याचे नाकारता कामा नये.

५) अनुज्ञप्तिधारक खरेदीदार, अडत्या, व्यापारी, हुंडेकरी, प्रक्रिया करणारे दलाल, निर्यातदार, तोलणार, हमाल व इतर अनुज्ञप्तिधारकांनी कायदा कलम ६ (१) व नियम ५ मधील तरतुदीनुसार नियमनाखालील वस्तूंची खरेदी - विक्री नव्या मुंबईत तुर्भे येथील मुख्य बाजारात करावयाची आहे. यासाठी त्यांना संबंधित वस्तू नव्या मुंबईतील मुख्य बाजार आवारातच विक्रीसाठी आणावयाचे बंधन राहील.

६) बाजार समितीच्या उपविधीमधील इतर पोटनियमांत काहीही अंतर्भूत असलेतरी या पोटनियामांतील तरतुदीप्रमाणे एखाद्या अनुज्ञप्तिधारकाने अथवा इतर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने/फर्मने/कंपनीने नियमनाखालील वस्तूंचे, मार्केटिंग (खरेदी-विक्री) नव्या मुंबईतील मुख्य बाजार आवाराबाहेर करण्याच्या हेतूने अशा शेतीमालाची भरलेली वाहने घेऊन जाण्याचा प्रयत्न केल्यास अथवा घेऊन गेल्यास बाजार समितीने अधिकृत केलेले अधिकारी संबंधीत शेतीमालाचे वाहन, शेतीमालासहीत जप्त करतील. जप्त केलेले वाहन शेतीमालासहीत मुख्य बाजार आवारात आणण्यात येईल, व सदरच्या जप्तीसाठी आलेला खर्च संबंधीत शेतीमालाचा मालधनी/अडत्या/व्यापारी/ सदरचे शेतीमालाचा कायदेशीर हक्कदार यांनी बाजार समितीकडे भरणा केल्यावर संबंधीतांस कायद्यातील तरतुदीनुसार सदरचा शेतीमाल बाजार आवारातच विक्रीस परवानगी देण्यात येईल. मात्र संबंधितांनी ठराविक मुदतीत मालाची विक्री न केल्यास सदर शेतीमालाची विक्री बाजार समितीतर्फे कायद्यातील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

७) बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात जर कोणतेही व्यापारी व्यक्ती/फर्म/कंपनी यांनी नियमनाखाली आणलेल्या शेतीमालाचा अनधिकृतरित्या घाऊक व्यापार करीत असल्याचे माहिती मिळाल्यास किंवा निदर्शनास आल्यास बाजार समितीचे अधिकृत अधिकारी, कायदा कलम ३२ अ (३) व (४) मधील तरतुदीप्रमाणे सदर व्यापाऱ्यांच्या गोदामात, ऑफीस कार्यालयात किंवा धंद्याच्या ठिकाणी प्रवेश करतील व संबंधित कागदपत्र/शेतमाल/वाहन/शेतमालासहीत वाहन जप्तकरतीलआणि कागदपत्र/शेतमाल/वाहन/शेतमालासहीत वाहन जप्त केल्याबद्दलची पावती देतील.

८) उपविधी क्र. ५ व ६ खालील तरतुदींच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीत/तपासणीत जर कायदा कलम ६ (१)चा भंग होत आहे अथवा होणार आहे असे बाजार समितीच्या अधिकाऱ्यास आढळून आल्यास त्यावेळी अधिकृत अधिकारी कायदा कलम ४६ प्रमाणे संबंधित दिवाणी न्यायाधीश वर्ग -१ कडे फौजदारी गुन्हा असा कायदा भंग करणाऱ्या व्यक्ती/फर्म/कंपनी विरूद्ध दाखल करतील.

९) बाजार समितीने अधिकृत केलेल्या इसमास कलम ५९(ब)प्रमाणे संबंधित पोलीस अधिकारी, वाहने थांबविणे, कागदपत्र जप्त करणे, तसेच दंडात्मक कार्यवाही करणे या कामात मदत करतील.

१०) जे कोणी वाहनधारक अधिकृत अधिकाऱ्यांचा हुकूम डावलून वाहन थांबविणार नाहीत, अथवा कागदपत्रे पाहणीस देणार नाहीत अथवा अशी कागदपत्रे जप्त करू देणार नाहीत, अशा वाहनधारकांना कलम ६१(२) प्रमाणे दर दिवशी रू० १००/- दंड करण्यात येईल. जोपर्यंत अधिकृत अधिकाऱ्यांना कागदपत्रे मिळणार नाहीत तोपर्यंत संबंधीत वाहन ज्या ठिकाणी थांबविले असेल तेथेच राहील. त्यासाठी ५९(ब) मधील तरतुदींनुसार पोलीस अधिकारी मदत करतील.

१२. **अनधिकृत इसमांना बाजार क्षेत्रात व्यवहार करण्यास मनाई :**

अधिनियम, नियम व उपविधी यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींना, योग्य अधिकारपत्रावाचून बाजारक्षेत्रात व्यवहार करीत असल्याचा वहीम आलेल्या कोणत्याही इसमाकडून, त्याच्या खरेखुरेपणाबद्दलचा पुरावा हजर करण्याविषयी, मागणी करण्याचा अधिकार असेल.

१३. (१) "बाजार क्षेत्रांत खरेदी केलेल्या शेतमालावर बाजार समितीला बाजार फी व देखरेख खर्च आकारण्याचा व वसूल करण्याचा अधिकार राहील. सदर फी व देखरेख खर्च खरेदीदारास द्यावा लागेल. अडत्यामार्फत व्यवहार झाल्यास सदर फी व देखरेख खर्च वसूल करून समितीकडे भरण्याची जबाबदारी अडत्याची राहील. असा व्यवहार अडत्या व्यतिरिक्त ज्यांच्यामार्फत होईल त्यांचेवर बाजार फी व देखरेख खर्च खरेदीदाराकडून वसूल करून बाजार समितीकडे भरणा करण्याची जबाबदारी राहील.

(२) बाजार फी व देखरेख खर्च दर प्रत्येक १००.०० रू. विक्री किंमतीवर अनुक्रमे ७५ पैसे व ५ पैसे असेल.

(३) बाजार समिती नियम ११६च्या अनुसार नमुना क्रमांक १९ मध्ये मार्केट फी रजिस्टर ठेवील तसेच खर्चाची नोंद ठेवील.

१४ (अ) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम १९६३ आणि नियम १९६७ व त्या अनुषंगाने तयार केलेल्या उपविधीतील तरतुदीनुसार बाजार फी, देखरेख फी, तोलाई, लेव्ही इत्यादी देय, असलेल्या रक्कमांचा भरणा, अशा रक्कमा ज्या महिन्यात देय होतील त्यांच्या पुढील महिना अखेर पर्यंत संबंधित अडत्या, व्यापारी आयातदार किंवा अन्य व्यक्तींनी बाजार समितीकडे केला पाहिजे. विहीत मुदतीत भरणा न केल्यास एकूण येणे असलेल्या रक्कमेवर दरसाल दर शेकडा २१% दराने व्याजाची आकारणी करण्यात येईल.

(ब) "इतर उपविधीत काहीही असले तरी जे व्यापारी/अडते व्यापारी घटक मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रांत काम करीत आहेत व त्यांना बाजार समितीने ठराविक मुदतीसाठी भाडेपट्ट्याने, दुकाने, गाळे, बँन्का, गोदाम, कार्यालये, कॅन्टीन, पोस्ट ऑफीस इत्यादीसाठी दिलेल्या जागा संबंधाने त्यांनी बाजार समितीस देय असलेल्या हप्त्यांच्या भाडेपट्टीची रक्कम, बाजारफी, देखरेखफी, विद्युत खर्च, पाणीखर्च, दूरध्वनीखर्च व इतर सेवा इत्यादीसाठी देय असलेल्या रक्कमांचा भरणा मुदत संपल्यापासून ७ दिवसांचे आंत संबंधितांकडून बाजार समितीकडे करणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत केलेल्या मुदतीत देय रक्कमांचा भरणा बाजार समितीकडे केला नाही तर बाजार समिती संबंधित बाजार घटकांशी स्वतंत्रपणे केलेल्या करारात (लिजडीड) नमुद केलेल्या व्याजाच्या आकारणीच्या दरापेक्षा द. सा. द. शे. ६% दराने दंड व्याज वसूल करण्याचा अधिकार बाजार समितीस राहील. मात्र अशा व्याजाचा दर द. सा. द. शे. २१% पेक्षा जास्त असणार नाही."

(क) उपविधी क्र. १४अ प्रमाणे वसुलीची देय असेल अशी कोणतीही रक्कम देण्यांत कसूर केली असता किंवा अशी रक्कम देण्यांचे टाळण्यांत आले असता. अशी वसुली योग्य एकूण रक्कम आणि

त्याखेरीज सदर वसुलीयोग्य रक्कमेहून अथवा रूपये दोनशे पन्नास हून (यांत जी जास्त असेल त्या रक्कमेहून) कमी नाही. आणि वसुलीयोग्य रकमेच्या पाचपटहून जास्त नाही एवढी रक्कम दंड म्हणून संबंधित देणेक-यांकडून वसूल करता येईल.

याप्रमाणे दंडासह वसूल योग्य असलेली रक्कम रु.........................................................

(अ) यथास्थिती खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकार किंवा व्यापारी याने बाजार समितीकडे ठेवलेल्या ठेवींच्या रक्कमेमधून.

(आ) असा खरेदीदार, अडत्या, प्रक्रियाकारकिंवा व्यापारी यांना हमी देणाऱ्या बँकेकडून अथवा व्यक्तीकडून अथवा संबंधित देणेकऱ्यांकडून वसूल करण्यास सक्षम असेल. बाजार समितीने याप्रमाणे मागणी केली असता ती सर्व रक्कम ती बँक अथवा व्यक्ती बाजार समितीला देईल.

**१५. जनावरांकरिता गेट पास फी :**

विक्रीसाठी आणल्या जाणाऱ्या प्रत्येक गुरेढोरे, मेंढ्या, बकरी, कुक्कुट यांवर बाजार समिती ठरवील त्या दराने गेट पास फी आकरण्यात येईल व अशा गेट पास फीची रक्कम जनावर आणणाऱ्या इसमाने प्रवेश करतेवेळी बाजार समितीस दिली पाहिजे.

**१६. खरेदीदारास द्यावयाचे बिल.**

या उपविधीसोबत परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये निर्दिष्ट केलेल्या नमुन्याप्रमाणे प्रत्येक विक्रेत्याने अगर अडत्यामार्फत व्यवहार झाल्यास अडत्याने खरेदीदारास विक्री केलेल्या मालासंबंधीचे बिल, शेतीमालाचे वजन, मोजमाप झाल्याबरोबर ताबडतोब दिले पाहिजे.

**१७. माल विक्रेत्यास द्यावयाची हिशेबपट्टी :**

प्रत्येक अडत्याने आणि अडत्याची नेमणूक केली नसल्यास खरेदीदाराने विक्री झालेल्या मालासंबंधी हिशेबपट्टी या उपविधीसोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १० अन्वये ठरवून दिलेल्या नमुन्याबरहुकूम विक्री झालेल्या मालाचे वजन अगर मोजमाप झाल्याबरोबर ताबडतोब तयार करुन विक्रेत्यास हिशेबपट्टी व संपूर्ण हिशेब दिला पाहिजे किंवा विक्रेता हजर नसल्यास त्यास पाठविला पाहिजे.

**१८. जनावरांची विक्री पावती :**

विक्री झालेल्या जनावरांची विक्रीची पावती निर्दिष्ट केलेल्या नमुन्याप्रमाणे असेल अशी पावती जनावरांची खरेदी केल्याबरोबर खरेदीदाराने, बाजार समितीचे अधिकृत इसमाकडून करुन घेतली पाहिजे व अशी पावती करणेबाबत बाजार समिती ठरविल त्या दराने खरेदीदाराने साक्षांकन फीची रक्कम दिली पाहिजे.

**(ड) विक्री, वजनमाप, हिशेब, साठा**

**१९. मालाची पोहच देणे :**

अडत्या किंवा खरेदीदार यांचे दुकानी माल विक्रीसाठी आल्याबरोबर त्याने आवक नोंदवहीत नोंद करुन माल आणणाऱ्या इसमास त्या मालाची पोहच पावती परिशिष्ट क्र. १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या नमुन्या प्रमाणे,

तावडतोब दिली पाहिजे.

२०. विक्रीची पद्धत :

१) कोणत्याही परिस्थितीत हप्ता पद्धतीने विक्री चालू रहाणार नाही.

२) विक्री जाहीर लिलाव पद्धतीने करण्यात येईल.

जाहीर लिलाव कोणत्या अडत्याच्या दुकानातून सुरु होईल यासंबंधीची माहिती त्या त्या दिवशी बाजार समितीस नोटीस बोर्डावर लावण्याचा अधिकार राहील.

जाहीर लिलाव सुरु होण्याचे अगोदर प्रत्येक अडत्या परिशिष्ट क्र. २२ मधील विहीत नमुन्यातील सौदापट्टीच्या तीन प्रतीत माहिती लिहून तयार ठेवील.

बाजार समितीने अधिकृत केलेल्या व्यक्तीस प्रत्येक अडत्याने जाहीर लिलावाचे वेळी सौदापट्टीच्या प्रती दिल्या पाहिजेत. त्या सौदापट्टीच्या माहितीच्या अनुषंगाने क्रमाने जाहीर लिलाव पुकारला जाईल. क्रमाने जाहीर लिलावात ज्या खरेदीदाराने जास्तीत जास्त भावाची बोली केली असेल तो भाव त्या खरेदीदाराचे नाव बाजार समितीचा अधिकृत इसम सौदापट्टीत नमूद करील व त्याच वेळी खरेदीदाराची सही घेईल.

प्रत्येक अडत्याच्या दुकानातील जाहीर लिलाव संपल्यानंतर त्या प्रत्येक सौदापट्टीवर संबंधित अडत्या व बाजार समितीचा अधिकृत इसम सह्या करतील. व त्यांच्या प्रती बाजार समिती व अनुज्ञप्तीधारी मापाड्यास वजन भार करण्यांसाठी देण्यात येतील.

३) काही विशिष्ट परिस्थितीत मा. कृषि पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पूर्व संमतीने ह्या पद्धतीत बदल करुन मालाची विक्री उघड कराराने किंवा नमुना पाहून अथवा निविदाने (टेंडर पद्धतीने) करता येईल.

४) विक्री झाल्यानंतर अनुज्ञप्तीधारी तोलणारा अगर मापाडी यांचे मार्फत मालाचे वजनमाप अगर सौदापट्टी करुन वजनमाप या पद्धतीपैकी जी पद्धत बाजार समिती ठरविल त्या पद्धतीने करण्यात येईल. व बाजार समितीने ठरवून दिलेल्या नमुन्यातच (परिशिष्ट क्र. ८) त्यांचेकडून काटा पट्टी तयार करुन संबंधितांना देण्यात येईल.

५) काटापट्टीच्या अनुरोधाने बिल व हिशोबपट्टी करण्यात येईल व त्याच्या प्रती अनुक्रमे संबंधित खरेदीदार बाजार समिती व मालधनी यांना देण्यात येतील.

६) विक्रीसाठी आलेला माल अडत्यास स्वतःकरता खरेदी करता येणार नाही. मात्र एखाद्यावेळी शेतीमालास खरेदीवर नसेल किंवा योग्य किंमत येत नसेल व विक्रेत्यास लगेच माल विकायचा असेल त्यावेळी अडत्या सचिवाचे पूर्वपरवानगीने असा माल खरेदी करु शकेल.

७) या कामी बाजार समितीस आवश्यक ते उपनियम करता येतील. जाहीर केलेल्या नियम व पद्धती

व्यतिरिक्त इतर पद्धतीने विक्री अगर खरेदी केल्यास असा व्यवहार अनधिकृत समजण्यात येईल.

२१. किरकोळ विक्री

**किरकोळ विक्री या शब्दाची व्याख्या व मर्यादा :-** किरकोळ या शब्दाचा अर्थ नियमन केलेल्या शेतमालाची थेट ग्राहकांना स्वतःच्या उपभोगासाठी खालील विहित केलेल्या कमाल मर्यादेत अधीन राहून केलेली विक्री असा असेल. प्रत्येक वेळेच्या किरकोळ विक्रीची मर्यादा खालीलप्रमाणे असेल. मात्र जनावरे, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, बकरी वगैरे बाबतीत सर्व व्यवहार हा ठोक समजण्यांत येईल.

| अ. क्र. | शेतीमालाचे नांव | एकाच वेळी विकण्यास यावयाच्या किरकोळी विक्रीची जास्तीत जास्त मर्यादा |
|---|---|---|
| १. | कांदे | १०० किलो |
| २. | बटाटे | १०० किलो |
| ३. | सर्व फळे | २ पेटी अथवा १ पाटी, खोके, गोण, बोचके २५ किलो पर्यंत |
| ४. | केळी, ऊस | १०० किलो |
| ५. | पालेभाज्या | १ गोण किंवा करंडी किंवा २५ जुडी |
| ६. | सुरण, कोन, भोपळा (सर्व प्रकारचे) | ५० किलो |
| | वरील व्यतिरिक्त सर्व फळभाज्या | प्रत्येकी १ पाटी, पेटी, गोण, बोचके किंवा करंडी |
| ७. | चिंच | १ पोते अगर गोण, बोचके, करंडी |
| ८. | आले | प्रत्येकी १ पोते, गोण किंवा करंडी |
| ९. | धान्ये - गहू, भात, ज्वारी, बाजरी, मका, सरसव, वार्ली, सावी, नागली, वरी, कोंद्रा, बावटो, नॉटो, चिनो, नवानी | १०० किलो |
| १०. | कडधान्ये - तूर, चणा, उडीद, मुग, वाल, छोला, वाटाणे (कडधान्याच्या डाळी) मसूर, चेवडा, बी, सांग (लाख) | १०० किलो |
| ११. | तेलबिया - भुईमुग | ८० किलो |
| १२. | अंबाडी, सरकी, एरंडी | १०० किलो |
| १३. | नारळ | ५० नग |

| | | |
|---|---|---|
| १४. | खुसराणी/करडई | १०० किलो |
| १५. | गूळ | ५० किलो |
| १६. | साखर | ७५ किलो |
| १७. | खांडसरी | ७५ किलो |
| १८. | जवस, तीळ, निगरसिडस, शेपा व थॉमस (अवजन बी) | ५० किलो |
| १९. | प्राणीजन्य पदार्थ - तूप | १४ किलो |
| २०. | मसाल्याचे पदार्थ | |
| | हळद | ६० किलो |
| | आले | २५ किलो |
| | लसूण | ४० किलो |
| | धणे | ४० किलो |
| | वरीअली | ३५ किलो |
| | मिरची | २५ किलो |
| | सुपारी (पोफळी) | १० किलो |
| | जिरे | ३५ किलो |
| | राई (मोहरी) | ५० किलो |
| | मेथी | ५० किलो |
| | डिंक | १० किलो |
| | विड्याची पाने | १ करंडा |
| | चिंच | ५० किलो |
| | वेलदोडे | १० किलो |
| २१. | आटा व गव्हाचे पीठ | ५० किलो |
| २२. | सुकामेवा | १० किलो |
| २३. | खाद्यतेल | १५ किलो |

**२२. बाजार परिमाणे :**

जाहीर केलेल्या शेतीमालाच्या खरेदी - विक्रीचे व वजनमाप सांगण्याचे परिमाणे खालीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | शेतीमालाचे नांव | दर ठरविण्याचे परिमाण | वजनमाप सांगण्याचे परिमाण |
|---|---|---|---|
| १. | कांदा-बटाटा | १० किलो | किलो |
| २. | खरबूज, कलिंगड, पपई, अननस, फणस | १ डझन, १ पाटी, १ पेटी, १ खोके | |
| ३. | केळी/ऊस | १ क्विंटल | क्विंटल |
| | भाजीची केळी, कच्चा फणस | १० किलो | किलो |
| ४. | इतर फळे | प्रत्येक पेटी, पाटी, गोण किंवा बोचके | पेटी, पाटी, गोण किंवा बोचके |
| ५. | पालेभाज्या | १०० जुड्या, गोण, १ करंडी | गोण, शेकडा, करंडी |
| ६. | सुरण, कोन, भोपळा (सर्व प्रकार) | १० किलो | शेकडा, गोण, पाटी |
| ७. | इतर सर्व फळभाज्या | १० किलो | १० किलो |
| ८. | चिंच | १ पोते, १ पाटी, करंडी, खोके १० किलो | किलो |
| ९. | आले, लसूण | १ पोते, क्विंटल | क्विंटल |
| १०. | अंडी, कोंबड्या, गुरे, मेंढरे, बकरी | मा. कृषि पणन संचालकाच्या अनुज्ञेने बाजार समिती ठरविल त्याप्रमाणे. | |
| ११. | लोकर, वेलची, मिरी | | |
| १२. | लोणी, तूप, दूध | | |
| १३. | चामडी आणि कातडी | | |
| १४. | वर उल्लेख केलेल्या व्यतिरिक्त इतर चटण्या, मसाल्याचे पदार्थ | | |
| १५. | गवत व वैरण | | |
| १६. | गुरांचा खुराक | | |
| १७. | मध | | |
| १८. | मासळी | | |
| १९. | जंगलापासून मिळणारे उत्पन्न | | |
| २०. | धान्ये सर्व | १०० किलो | किलो |
| २१. | कडधान्ये सर्व | १०० किलो | किलो |
| २२. | तेलबिया | १०० किलो | किलो |
| २३. | नारळ | १०० नग | नग |
| २४. | गूळ | ५० किलो | किलो |
| २५. | साखर | १०० किलो | किलो |
| २६. | लसूण, मिरची, हळद, चिंच, बरिअली, राई (मोहरी) | १०० किलो | किलो |

| | | | |
|---|---|---|---|
| | डिंक, आले, धणे, जिरे | १० किलो | क्विंटल |
| २७. | विड्याची पाने | १००० नग | नग |
| २८. | वेलदोडे | १ किलो | किलो |
| २९. | आटा (गव्हाचे पीठ) | १०० किलो | क्विंटल |
| ३०. | सुकामेवा | १० किलो | किलो |
| ३१. | खाद्यतेल | १५ किलो | किलो |

**२३. वजनमापाची साधने**

१) प्रत्येक अडत्या, व्यापारी, वखारवाला व प्रक्रिया करणारे यांनी बाजार किंवा बाजार क्षेत्रात वापरण्याकरिता वजन मापाची खालील साधने ठेवली पाहिजेत.

अ) एका वेळी किमान एक क्विंटल वजन करता येईल असे वजनाचे साधन व साहित्य.

ब) एक ग्रॅमपासून १०० किलो पर्यंतचे वजन करण्याची सर्व वजने.

क) द्रव पदार्थाकरिता वापरावयाची साधने व साहित्य.

२) बाजार समितीने संग्रही ठेवलेल्या प्रमाणभूत वजन व मापाची साधने यांचा इतर वजन मापाशी पडताळा पहाणेचा दर क्विंटलमागे १५ नये पैसे अगर बाजार समिती ठरविल त्याप्रमाणे असेल.

३) बाजार समितीने वे ब्रिजची व्यवस्था केल्यास, अशा वे ब्रिजवर वजन करण्याचा दर ठरविण्याचा अधिकार समितीला राहिल.

अ) तसेच बाजार समितीने वजन - काट्याची व्यवस्था केल्यास अशा काट्याचे दर हा प्रत्येक गोणीस पोत्यास ३ पैसे प्रमाणे राहिल. मात्र हिशोबाच्या दृष्टीने कमीत कमी ५ पैसे असा दर आकारण्यात येईल व त्यापुढील आकार हा जवळच्या ५ पैशाच्या भागात असेल.

४) वरील (१) ते (२) चे बाबतीत आवश्यक वाटल्यास बाजार समितीस योग्य तो फेरबदल करण्याचा अधिकार राहील.

**२४. शेतीमाल साठविणे बाबत :**

१) बाजार समितीकडे नोंदलेल्या बाजार क्षेत्रातील कोणत्याही गुदामात, इमारतीच्या शेडमध्ये, खुल्या आवारात किंवा माल साठवून ठेवण्याच्या कारणाकरिता वापरलेल्या कोणत्याही इतर जागेत शेतीमाल साठवून ठेवता येईल. अशा प्रकारच्या ठिकाणांची नोंदणी करण्याकरिता प्रत्येक बाजार वर्षाकरिता प्रत्येकी ५.०० रू. नोंदणी फी आकारण्यात येईल.

२) एखाद्या जागेची, शेतीमाल साठवून ठेवण्याची जागा नोंदणी करण्याविषयीचा परिशिष्ट क्रमांक १३ मध्ये दिलेल्या नमुन्यात अर्ज मिळाल्यावर बाजार समितीने योग्य वाटल्यास नोंदणी करण्यात आलेली आहे, अशा अर्थाचा दाखला दिला पाहीजे.

३) ज्या ठिकाणी, मालधन्याने आपल्या स्वतःच्या घरगुती वापरासाठी स्वतःचे घरात शेतीमाल साठवून ठेवला असेल त्याठिकाणची या उपविधीन्वये नोंदणी करण्याची आवश्यकता असणार नाही.

४) शेतीमाल साठवून ठेवण्याचे नियमन करण्यासाठी बाजार समितीस आवश्यक वाटतील असे हुकूम करण्याचा अधीकार आहे. मात्र ही तरतूद मध्यवर्ती व राज्य वखार महामंडळ गुदामाना लागू असणार नाही.

५) अनुज्ञप्तिधारींनी गुदामात साठविलेला शेतीमाल योग्य स्थितीत राहण्यासाठी व ओल, पाऊस, कीड, आग, पक्षी, वगैरेपासून नुकसान न होईल या बद्दल आवश्यक ती दक्षता घ्यावी. त्या मालावर वेळोवेळी जंतुनाशक व किटकनाशक औषधाचे फवारे मारण्यात यावेत. या कामी बाजार समितीकडून तजवीज होईल तर त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे किंवा राज्य व मध्यवर्ती सरकारच्या वखार महामंडळामार्फत असलेल्या सोई उपलब्ध करून घ्याव्यात. खते, विषारी, रासायनिक पदार्थ, औषधे अशा वस्तू शेतीमालाजवळ अगर समोर ठेवू नयेत.

६) बृहन्मुंबईतील बाजारक्षेत्रामध्ये किरकोळ विक्री करणाऱ्या कुणाही इसमास एकावेळी तशी विक्री करण्याचे हेतूने खालील विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक शेतीमाल धारण करता येणार नाही अथवा अशा शेतीमालाचा साठा करता येणार नाही.

| अ. क्र. | शेतीमाल | विहीत/मर्यादा |
|---|---|---|
| १. | कांदा | १० टन |
| २. | बटाटा | १० टन |
| ३. | ऊस | ५०० किलो ग्रॅम |
| ४. | गुळ | १० क्विंटल |
| ५. | नारळ | ५० बॅग |
| ६. | साखर | २० क्विंटल |
| ७. | खांडसरी | ३० क्विंटल |
| ८. | लसूण | ५० बॅग |
| ९. | सर्व प्रकारची फळे | ३ टन |
| १०. | सर्व प्रकारच्या फळभाज्या | ३ टन |
| ११. | सर्व प्रकारच्या पालेभाज्या | ३००० जुडी |
| १२. | खाद्यतेल/तूप | ४५० कि. ग्रॅ./५०० लि. |
| १३. | धान्ये | ३० क्विंटल |
| १४. | कडधान्ये (कडधान्याच्या डाळी) | ३० क्विंटल |
| १५. | सुकामेवा | १०० कि. ग्रॅ. |
| १६. | तेलबिया | १० क्विंटल |

२५. बाजार आकार :

अडते, व्यापारी दलाल, तोलणारे, मापणारे, सर्वेक्षक, प्रक्रिया करणारे, हमाल निर्यातदार, गाडीभाडे आणि वटवणी अभिकर्ते तसेच गुदामधारक व इतर अनुज्ञप्तिधारी यांच्या कामगिरीबद्दल व शेती उत्पन्नाच्या खरेदी व विक्री या संबंधात केलेल्या इतर कामाबद्दल त्यांनी आकारावयाचे बाजार आकार खालील प्रमाणे असतील.

| शेतीमाल (१) | बाजार आकाराचा प्रकार (२) | परिणाम (३) | दर (४) | कोणाकडून (५) |
|---|---|---|---|---|
| कांदे-बटाटे | अडत (कमिशन) | १०० रू. विक्री किंमत | ६.५० | मालधनी |
| '' | तोलाई | अ) उघडा विक्री | ०.३७ | मालधनी अगर अडत्या |
| '' | '' | ब) १०० किलोस | १.५१ | मालधनी अगर अडत्या |
| सर्वफळे | अडत (कमिशन) | १०० रू. विक्री किंमत | १०.०० | मालधनी |
| | तोलाई | अ) प्रत्येक पाटी, पेटी, अथवा गोण | ०.५७ | मालधनी अगर अडत्या |
| '' | '' | ब) संत्रा, मोसंबी, आंबा ट्रकमधून सुटा आल्यास ट्रकला | १५०.४४ | मालधनी अगर अडत्या |
| '' | '' | क) संत्रा, मोसंबी, आंबा वगळून इतर फळे ट्रकमधून सुटे आल्यास ट्रकला | ७५.२३ | मालधनी अगर अडत्या |
| फळभाज्या | अडत (कमिशन) | १०० रू. विक्री किंमत | ८.०० | मालधनी |
| '' | तोलाई | अ) १०० किलोस | १.५१ | मालधनी अगर अडत्या |
| '' | '' | ब) ट्रकमधुन सुटा आल्यास ट्रकला | ७५.२३ | मालधनी अगर अडत्या |
| '' | '' | क) पाटी, पेटी, बोचके | ०.३७ | मालधनी अगर अडत्या |
| पालेभाज्या | अडत (कमिशन) | १०० रू. विक्री किंमत | ८.०० | मालधनी |
| '' | तोलाई | प्रत्येक गोण, पाटी, पेटी, करंडी १०० जुड्यात | ०.३७ | मालधनी अगर अडत्या |

| (१) धान्ये | (२) अडत (कमिशन) | (३) १०० रूपये विक्री किंमत | (४) | (५) मालधनी |
|---|---|---|---|---|
| १) गहू साले काढलेला व न काढलेला | | '' | २.७५ | |
| २) भात-साले काढलेला व न काढलेला | | १०० रूपये विक्री किंमत १०० किलोस | २.७५ | मालधनी |
| ३) ज्वारी | | '' | २.७५ | मालधनी |
| ४) बाजरी | | '' | २.७५ | मालधनी |
| ५) मका | | '' | २.७५ | मालधनी |
| ६) सरसव | | '' | ६.०० | मालधनी |
| ७) सावी | | '' | २.७५ | मालधनी |
| ८) नागली | | '' | २.७५ | मालधनी |
| ९) वरी | | '' | २.७५ | मालधनी |
| १०) कोद्रा | | '' | २.७५ | मालधनी |
| ११) बाबटो | | '' | २.७५ | मालधनी |
| १२) नॉटो | | '' | २.७५ | मालधनी |
| १३) चिनो | | '' | २.७५ | मालधनी |
| १४) नवानो | | '' | २.७५ | मालधनी |
| १५) वार्ली | | '' | २.७५ | मालधनी |
| वरील सर्व धान्ये तोलाई | | १०० किलोस | ०.४० | मालधनी अगर अडत्या |
| कडधान्ये | अडत (कमिशन) | १०० रूपये विक्री किंमत | २.७५ | मालधनी |
| १) तूर | | '' | २.७५ | '' |
| २) चणा | | '' | २.७५ | '' |
| ३) उडीद | | '' | २.७५ | '' |
| ४) मूग | | '' | २.७५ | '' |
| ५) वाल | | '' | २.७५ | '' |
| ६) छोला | | '' | २.७५ | '' |
| ७) मटकी | | '' | २.७५ | '' |
| ८) वाटाणे | | '' | २.७५ | '' |
| ९) कुळीथ | | '' | २.७५ | '' |
| १०) डाळी | | '' | २.७५ | '' |
| कडधान्याच्या डाळी | अडत (कमिशन) | १०० रूपये विक्री किंमत | | मालधनी |
| ११) मसूर | | '' | २.७५ | '' |
| १२) चवळा बी | | '' | २.७५ | '' |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| वरील सर्व कडधान्ये | तोलाई | १०० किलोस | ०.४० | मालधनी अगर अडत्या |
| <u>तेलबिया</u> | | | | |
| १) भुईमूग | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ६.०० | मालधनी |
| २) जवस | | ,, | २.७५ | ,, |
| ३) तीळ | | ,, | ६.०० | ,, |
| ४) करडई | | ,, | २.७५ | ,, |
| ५) अंबाडी | | ,, | २.७५ | ,, |
| ६) नारळ | | ,, | ६.०० | ,, |
| ७) सरकी | | ,, | २.७५ | ,, |
| ८) एरंडी | | ,, | २.७५ | ,, |
| ९) खुसराणी | | ,, | २.७५ | ,, |
| १०) निगरसिडस् | | ,, | २.७५ | ,, |
| ११) थॉमाला (अजवन बी) | | ,, | ६.५० | ,, |
| १२) शेपा | | ,, | २.७५ | ,, |
| १३) नारळ सोडून इतर तेलबिया | तोलाई | १०० किलोस | ०.४० | मालधनी अगर अडत्या |
| नारळ | तोलाई | १०० नगास | ०.४० | मालधनी अगर अडत्या |
| गूळ | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ६.५० | मालधनी अगर अडत्या |
| | तोलाई | १०० किलोस | ०.४० | |
| साखर | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ३.०० | मालधनी अगर अडत्या |
| | तोलाई | १०० किलोस | ०.४० | |
| <u>मसाल्याचे पदार्थ व इतर</u> | | | | |
| १) हळद | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ६.०० | मालधनी |
| २) आले | | ,, | ६.०० | मालधनी |
| ३) लसूण | | ,, | ६.०० | मालधनी |
| ४) धने | | ,, | ६.०० | मालधनी |
| ५) बरिअली | | ,, | २.७५ | मालधनी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ६) सुपारी (पोफळी) | | १०० रुपये विक्री किंमत | ७.०० | मालधनी |
| | | | | मालधनी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७) जिरे | | | ६.०० | मालधनी |
| ८) राई (मोहरी) | | " | ६.०० | मालधनी |
| ९) मेथी | | " | ६.०० | मालधनी |
| १०) मिरची (सुखी) | | " | ७.०० | मालधनी |
| | | " | | |
| ११) मिरी | | " | ६.०० | मालधनी |
| १२) चिंच | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ६.०० | मालधनी |
| वरील सर्व मसाल्याचे पदार्थ | तोलाई | १० किलोस | ०.०४ | मालधनी अगर अडत्या |
| १३) वेलदोडे | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ५.०० | मालधनी |
| | तोलाई | १० किलोस | ०.०४ | मालधनी अगर अडत्या |
| १४) काजू | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | २.७५ | मालधनी |
| १५) डिंक | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | २.७५ | मालधनी |
| | तोलाई | १० किलोस | ०.०४ | मालधनी अगर अडत्या |
| १६) विड्याची पाने | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | २.७५ | मालधनी |
| | तोलाई | १ करंडा | ०.०४ | मालधनी अगर अडत्या |
| प्राणीजन्य पदार्थ | | | | |
| १) तूप | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ८.०० | मालधनी |
| | तोलाई | १०० किलोस | ०.४० | मालधनी अगर अडत्या |
| आटा (गव्हाचे पीठ) | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | २.७५ | मालधनी |
| | तोलाई | १०० किलोस | ०.४० | मालधनी अगर अडत्या |
| सुकामेवा | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | ५.५० | मालधनी |
| | तोलाई | १०० किलोस | ०.०४ | मालधनी अगर अडत्या |
| खाद्यतेल | अडत (कमिशन) | १०० रुपये विक्री किंमत | २.७५ | मालधनी |
| | तोलाई | १०० किलोस | ०.४० | अगर अडत्या |

टिप : महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ अंतर्गत प्रस्थापित केलेला किराणाबाजार व दुकाने मंडळ आणि मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ यांचा समावेश झाल्यामुळे ग्राहक मूल्य निर्देशांकानुसार मंडळ व बाजार समिती वेळोवेळी सर्व संमतीने ठरवील ते हमालीचे दर व त्यावर प्रचलित दराने होणारी लेव्ही बाजार समितीने निर्देशीत केलेल्या तारखेपासून -

अ. मुख्य बाजार आवार, तुर्भे (कांदा-बटाटा व लसूण)

ब. फळे व भाजीपाला घाऊक बाजार संकुल, तुर्भे

क. विकास टप्पा - २, मार्केट - १, तुर्भे

ड. विकास टप्पा - २, मार्केट - २, तुर्भे येथे अंमलात येईल.

२) आडत सदराखाली आडत्या, दलाल (ब्रोकरेज) टपाल, तार, टेलीफोन इत्यादींचा समावेश आहे.

३) वाहतूक, हमाली व त्यावरील लेव्ही, तोलाई इत्यादी खर्च कपातीस पात्र राहील. या व्यतिरिक्त कुठल्याही कपाती या नियमबाह्य असतील.

## (इ) प्रशासनिक

**२६. समिती :**

मुंबई बाजार समितीची घटना महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१अ) प्रमाणे असेल.

**२७. सभा बोलाविणे :**

१) बाजार समितीची सभा निदान महिन्यातून एकदा बोलाविली पाहिजे मात्र दोन सभामधील अंतर साठ दिवसांपेक्षा जास्त असता कामा नये.

२) उपसमितीच्या सभा प्रसंगानुसार सभापतीच्या सल्ल्याने सचिवाने बोलाविल्या पाहिजेत.

३) संचालक स्वत: किंवा त्याने अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस निकडीच्या कामकाजासाठी बाजार समिती सभा बोलविण्याचा अधिकार असेल.

४) बाजार समितीच्या निम्म्याहून अधिक सदस्यांनी लेखी मागणी केल्यास मागणीचा अर्ज मिळाल्यापासून दहा दिवसाच्या आत सभापतीने बाजार समितीची सभा बोलाविली पाहिजे. सदरहू मुदतीत सभा न बोलविल्यास सभेची लेखी मागणी करणाऱ्या सदस्यांनी संचालकाकडे वा त्याने सर्वसाधारण वा विशिष्ट आदेशान्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास कळविल्यास संचालकाने वा प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्याचे अर्ज मिळाल्या तारखेपासून कमाल १५ दिवसांचे आत बाजार समितीची सभा बोलाविली पाहिजे अशा सभेला संचालक वा त्याच प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास हजर राहण्याचा अधिकार असेल.

**२८. निवडणूक निधीसाठी राखीव रक्कम :**

सदर बाजार समितीच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या ५ टक्के अगर रुपये २ हजार यामध्ये जो रक्कम बाकी असेल ती रक्कम अधिनियम १४ अ नुसार निवडणूक निधी म्हणून राखून ठेवण्यात येईल.

**२९. सभांच्या नोटीसा :**

१) बाजार समितीची सभा बोलावणारी दहा दिवसांची नोटीस प्रत्येक सभासदास देण्यात आली पाहिजे. सदरहू नोटीशीत सभेची तारीख, वेळ व स्थळ चालवावयाच्या कामकाजाची पत्रिका ही नमूद केली असली पाहिजे. सदरहू नोटीशीची एक प्रत संचालक किंवा संचालकाने याबाबतीत अधिकार दिलेल्या इतर कोणत्याही इसमास पाठविली पाहिजे. तातडीने कामकाज चालविण्यासाठी भरावयाच्या सभांच्या बाबतीत तीन दिवसांची नोटीस पुरेशी आहे असे समजण्यात आले पाहिजे.

२) सभांच्या सर्व नोटीसा, सभापती किंवा त्यांच्या गैरहजेरीत उपसभापती यांच्या सल्ल्यांनी तयार करुन सचिव याने सदस्यांना पाठविल्या पाहिजेत.

३) गणपूर्तीच्या अभावी तहकूब करण्यात आलेल्या सभेच्या बाबतीत उपविधी २९(१) लागू होणार नाही. तहकूब करण्यात आलेल्या सभेची वेळ, जागा व तारीख असलेली नोटीस सूचना फलकावर लावून जाहीर केली पाहिजे. सूचना फलकावर अशा रितीने नोटीस जाहीर करणे हे सदस्यांना पुरेशी खबर देणे होय, असे समजण्यात आले पाहिजे. गणपूर्तीच्या अभावी तहकूब झालेली सभा, अशा तहकूब झालेल्या सभेच्या तिसऱ्या दिवशी मूळ सभेच्या नोटीशीत नमूद केलेल्या स्थळी व वेळी भरविली पाहिजे.

**३०. सभांच्या कार्यक्रम पत्रिका :**

सभेची नोटीस काढण्यापूर्वी सदस्याने बाजार समितीच्या विचारासाठी मांडण्याबद्दल लेखी कळविलेले सर्व विषय व ठराव तसेच कार्यालयातर्फे मांडण्यात येणारे सर्व विषय व ठराव, सचिवाने सभेच्या कार्यक्रम पत्रिकेत समाविष्ट केले पाहिजेत.

**३१. सभांतील गणपूर्ती :**

बाजार समितीच्या सभेत मतदानाचा हक्क असणाऱ्या एकूण सदस्यांपैकी (५) सदस्यांची गणपूर्ती होईल. जर आवश्यक संख्येतील सभासद हजर नसतील तर हजर असलेल्या सदस्यांना किमान एक (१) तासाने गणपूर्ती पूर्ण झाल्यास सभेचे कामकाज चालविता येईल. बाजार समितीच्या सभेस आवश्यक ती गणपूर्ती असल्याशिवाय समितीच्या सभेचे कोणतेही कामकाज चालविता येणार नाही. व अशी गणपूर्ती न झालेली सभा रद्द समजण्यात येईल.

**३२. सभा चालविणे :**

१) सभापती अगर त्याचे गैरहजेरीत उपसभापती अगर दोहोंच्या गैरहजेरीत उपस्थित असलेल्या सदस्यांनी निवडलेल्या सदस्याने त्या सभेचा अध्यक्ष या नात्याने सभेचे कामकाज चालविले पाहिजे. मात्र अशा सभेचे कामकाज चालू असताना सभापती किंवा उपसभापती सभास्थानी उपस्थित झाल्यास निवडून आलेल्या

अध्यक्षाने आपले अध्यक्षपद सभापती किंवा उपसभापती यांचेकडे सुपूर्त केले पाहिजे. सभेच्या अध्यक्षाने सभेतील सर्व कामकाजाच्या रितीचे नियमन केले पाहिजे. सभा शिस्तीने चालविण्याकरिता त्याच्या मते आवश्यक असेल अशी उपाययोजना करण्याचाही त्यास अधिकार आहे.

२) सभेच्या अध्यक्षाने सभेच्या कामकाजाच्या रीतीसंबंधीच्या सर्व मुद्यांचा निर्णय केला पाहिजे आणि अशा बाबतीत त्याचा निर्णय अखेरचा असेल.

३) सदस्याने उपस्थित केलेल्या सर्व शिस्तविषयक मुद्यांच्या सभेच्या अध्यक्षाने निर्णय केला पाहिजे आणि अशा बाबतीत त्यांचा निर्णय अखेरचा असेल.

४) सभेच्या अध्यक्षास सभेतील सर्व प्रश्नांवर बोलण्याचा व मत देण्याचा अधिकार असेल.

५) प्रत्येक सदस्यास फक्त एकच मत असेल. परंतु मते सारखी पडल्यास प्रसंगी सभेच्या अध्यक्षास निर्णायक किंवा दुसरे मत असेल.

३३. सूचना व उपसूचना :

१) सभेच्या अध्यक्षाने मांडलेल्या ठराव व उपसूचना खेरीज करुन प्रत्येक ठराव व उपसूचना योग्य रितीने सुचविलेली व अनुमोदन देण्यात आलेली असली पाहिजे.

२) अध्यक्षाने मांडलेल्या किंवा योग्य रितीने सुचविलेला व अनुमोदन दिलेला प्रत्येक ठराव व उपसूचना तावडतोब लिहून ठेवली पाहिजे. असे सर्व ठराव, मग ते सभेत मंजूर वा नामंजूर झालेले असोत, सुचविणारा व अनुमोदन देणारा यांच्या नावासह सभेच्या कामकाजाच्या टाचणात समाविष्ट केले पाहिजेत.

३)एखाद्या ठरावास ज्या क्रमाने उपसूचना सुचविण्यात आल्या असतील त्याच क्रमात त्या सर्व मांडल्या पाहिजेत आणि मंजूर झालेल्या उपसूचनांवरुन सुधारलेला मूळ ठराव त्यानंतर मतास टाकला पाहिजे.

३४. मत देण्याची रीत :

१) सभेस हजर असलेल्या कोणत्याही तीन सदस्यांनी मत नोंदणीची मागणी केली असेल, तो प्रसंग खेरीजकरुन हात वर करुन मते घेता येतील. हात वर करुन मते घेण्यात आली असतील त्या सर्व बाबतीत ठरावाच्या बाजूने व त्याचेविरुद्ध मत देणाऱ्या सदस्यांची नावे कामकाजाच्या टाचण्यात नोंदली पाहिजेत.

२) कोणत्याही सभेत जे कोणतेही प्रश्न येतील त्या सर्वांचा निर्णय यासंबंधी केलेले अधिनियम, नियम व उपविधी व त्याखालील केलेले उपनियम यास पात्र राहून सभेस हजर असलेल्या बहुसंख्य सदस्यांचे मतावरुन करण्यात आला पाहिजे.

३५. ठरावाचा फेरविचार करणे :

बाजार समितीच्या कोणत्याही सभेत मांडण्यात आलेला व मंजूर वा नामंजूर झालेला कोणताही ठराव किमान

तीन महिन्याची मुदत संपण्यापूर्वी फेरविचारासाठी घेता कामा नये तथापि काही अपरिहार्य कारणामुळे अशा ठरावावर फेरविचार करण्याची आवश्यकता भासल्यास त्यास किमान ९ सदस्यांची संमती असणे आवश्यक आहे.

**३६. सभेतील कामकाजाची भाषा :**

सभांचे कामकाज मराठी भाषेत चालविण्यास व नोंदविण्यात आले पाहिजे.

**३७. सभांची टाचणे :**

१) सभेतील झालेल्या ठरावाचे अनुषंगाने सभांचे टाचण सचिवाने तयार केले पाहिजे. व टाचण पुस्तकावर सचिवाने सही केली पाहिजे.

२) नियम १०६ अन्वये कामकाजाच्या टाचण पुस्तकात लिहिलेले बाजार समितीच्या प्रत्येक सभेचे कामकाज बाजार समितीच्या पुढील सभेत वाचून दाखविण्यात व सभेच्या अध्यक्षांच्या सहीने कायम करण्यात आले पाहिजे.

**३८. उपसमित्यांची नियुक्ती :**

बाजार समितीला खाली किंवा योग्य वाटतील अशा अन्य उपसमित्या नेमण्याचा व त्यांना योग्य वाटतील असे अधिकार सुपुर्त करण्याचा व कर्तव्य नेमून देण्याचा अधिकार राहील.

**उपसमित्यांची नावे :**

१) यांत्रा उपसमिती

२) सेवक उपसमिती

३) अनुज्ञप्ति उपसमिती

४) बांधकाम उपसमिती

५) नियमन उपसमिती

६) प्रतवारी उपसमिती

अधिनियम, नियम व उपविधी यात अन्य रितीने तरतूद न करण्यात आली असेल ते खेरीज करुन उपसमितीच्या सभा, बाजार समितीच्या सभा, चालविण्यासाठी ठरविलेले उपविधी यास अनुसरुन चालविण्यात आल्या पाहिजेत.

**३९. सदस्यांना द्यावयाच्या भत्त्यासंबंधी :**

बाजार समितीच्या सभांना हजर राहणेसाठी किंवा कामकाजासंबंधी प्रवास करावा लागल्यास सदस्यास खाली दराने भत्ते देण्याचा बाजार समितीस अधिकार आहे.

अ) प्रवासभत्ता :

| | | |
|---|---|---|
| १) | रेल्वेने प्रवास केल्यास | ज्या वर्गाने प्रवास केला असेल त्या वर्गाच्या दीड पट भाडे |
| २) | एस. टी. ने प्रवास केल्यास | एस. टी. चे दीडपट भाडे |
| ३) | स्वतःचे स्वयंचलीत, दुचारी भाड्याचे वाहनाने वा अन्य वाहनाने प्रवास केल्यास | निघण्याची व पोचण्याची ठिकाणे रेल्वेने जोडलेली असल्यास रेल्वेचे पहिल्या वर्गाचे दीडपट भाडे व रेल्वेने जोडलेली नसल्यास एस. टी. चे दीडपट भाडे |

याशिवाय नियमानुसार दैनीक भत्ता

ब) मुंबईत बाजार समितीचे कामकाजासाठी मुक्काम केल्यास सदस्यास मुक्काम १२ तासापेक्षा कमी असल्यास २५/- रूपये व १२ तासापेक्षा जास्त असल्यास ५०/- रूपये दराने दैनिक भत्ता देता येईल. मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणी दैनिक भत्त्याचा दर २५/- रूपये राहील.

क) सभा उपस्थिती भत्ता प्रत्येक सभेकरिता रूपये ५०/-

**४०. न्यायाधिकरण-खर्चासंबंधी :**

१) न्यायाधिकरण मंडळाला अधिनियम कलम ५७ अन्वये द्यावयाच्या न्यायासनाचे अनुषंगाने येणारा योग्य खर्च बाजार समितीने केला पाहिजे.

२) न्यायाधिकरण मंडळाला द्यावयाचे सर्व प्रकारचे भत्ते समिती सदस्याला द्यावयाच्या भत्त्यासंबंधी जे नियम केले असतील त्या दराने देण्याचे आहेत.

**४१. बाजार समितीचे अधिकारी व सेवकांकरिता सेवेचे नियम व अटी :**

नियम १०० यास पात्र राहून संचालकांचे पूर्वसंमतीने बाजार समितीला आवश्यक वाटतात असे अधिकारी व सेवक वर्ग नेमून घेण्याचा अधिकार राहील. अशा अधिकारी व सेवक वर्गाचे, नेमणूक, सेवा, भविष्यनिधी, प्रवास व रोज भत्ता या संबंधीचे नियम त्यांना देण्याच्या वेतनश्रेणी, महागाई भत्ते, प्रवासभत्ते रजेचे भत्ते रोजीदे, भविष्यनिधी उपदान, निवृत्ती वेतन, अपघात नुकसान भरपाई, वाहन भत्ते, कल्याण निधी या संबंधीचे नियम संचालकांचे पूर्व संमतीने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे असतील.

अ) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदावर अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था या पदावरील अथवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील सहकार खात्यांचा अधिकारी सचिव म्हणून राहील.

**४२. काटापट्टी बिल व हिशोब पट्टी यांचे नमुने ठरविणे :**

या उपविधी सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ८, ९, १०, ११ मध्ये ठरवून दिलेल्या नमुन्यावर हुकूम अनुक्रमे काटापट्टी, हिशोबपट्टी व विक्री नोंदवही असतील.

४३. अभिलेख परिरक्षण :

बाजार समितीची कामकाजासंबंधी सर्व कागदपत्रे व दस्तऐवज बाजार समितीच्या कार्यालयात सुरक्षितपणे ठेविले पाहिजेत आणि सदरचे कागदपत्र व दस्तऐवज सुरक्षितपणे संग्रही ठेवण्याची कालमर्यादा परिशिष्ट क्रमांक १४ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल. या कालमर्यादेनंतर बाजार समिती ठरवेल त्याप्रमाणे त्या कागदपत्रांची, दस्तऐवजांची विल्हेवाट लावली पाहिजे.

४४. व्यापार करणाऱ्याच्या वेळा व सुट्या जाहीर करणे, सुट्यांचे म्हणून जाहीर करण्यात आलेले व ४४ (२) अन्वये फर्मावण्यात येईल व ते दिवस खेरीज करुन इतर सर्व दिवशी खालील वेळात बाजार व्यापाराकरिता खुला असेल.

| अ. क्र. | मुख्य किंवा दुय्यम बाजारांचे नांव | बाजाराची वेळ | भोजनाची सुट्टी | सुट्टीचा दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य बाजार आवार, तुर्भे | स. ८.३० ते ६ | १ ते २ | रविवार |
| २ | विकास टप्पा २ मा. १ तुर्भे | स. ११ ते ७ | १ ते २ | ,, |
| ३ | विकास टप्पा २ मा. २ तुर्भे | स. ११ ते ७ | १ ते २ | ,, |
| ४ | विकास टप्पा २ मा. ३ | स. ११ ते ६ | १ ते २ | ,, |
| ५ | फळ विभाग, तुर्भे | स.६.३० ते ६ | १ ते २ | ,, |
| ६ | भाजीपाला विभाग, तुर्भे | स. ३ ते दु. ४ | १ ते २ | ,, |

टिप : वरील बाजारांच्या वेळा परिस्थितीनुसार वेळोवेळी बदलण्याचा अधिकार बाजार समितीस राहिल.

प्रत्येक वर्षाचे सुरुवातीस बाजार समितीने सुट्यांची यादी तयार करुन सूचना फलकावर प्रसिद्ध केली पाहिजे. जर कोणतीही जादा खास सुट्टी द्यावयाची असेल तर सभापती किंवा त्यांचे गैरहजेरीत उपसभापती तसा हुकूम करतील.

सभापती किंवा त्यांचे गैरहजेरीत उपसभापती यांना कोणतेही विवक्षित दिवशी उपविधी ४४ (१) अन्वये ठरविलेल्या वेळा खेरीज व्यापार इतरवेळी सुरू होईल व संपेल असे जाहीर करण्याचा अधिकार राहील.

४५. अधिनियम, नियम, उपविधी प्रसिद्ध करणे, पहाणेबाबत :

प्रत्येक बाजार समितीने अधिनियम, नियम व उपविधी व बाजार समितीच्या वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या अधिसूचना संग्रही अद्यावत ठेवल्या पाहिजेत. योग्य त्या अधिकाऱ्याकडून संमत होवून मिळालेल्या उपविधीची एक प्रत बाजार समितीचे सूचना फलकावर प्रसिद्ध केली पाहिजे. ही सर्व कागदपत्रे कोणत्याही व्यक्तीस बाजार समितीच्या कार्यालयात, कार्यालयाच्या वेळात (सुट्टीचे दिवस खेरीज करुन) पाहण्यास मुभा असेल.

**४६. उपविधी भंग :**

सदर उपविधीपैकी कोणत्याही उपविधीचे उल्लंघन करणारा इसम, गुन्ह्याच्या शाबितीनंतर, अधिनियम कलम ६१ (२) अन्वये रू. १००/- पर्यंत दंडास पात्र राहील.

**४७. उपविधी विक्री :**

बाजार समिती सदर उपविधींच्या प्रती, त्याची किंमत ठरवून विक्रीस ठेवील.

**४८. या उपविधीखाली उपनियम करणेचा बाजार समितीचा अधिकार :**

संचालकाचे पूर्व मंजुरीस पात्र राहून खालील बाबतीत उपनियम करण्याचा बाजार समितीस अधिकार आहे.

१) आवक झालेल्या शेतीमालाचा नमुना तपासणे व अशा नमुन्याचा साठा जपून ठेवणे.

२) शेतीमालाचे प्रकार व प्रमाणभूत नमुने ठरविणे, भेसळ प्रतिबंधक उपाययोजना करणे.

३) ॲगमार्क व प्रतवार करणेचे खर्चाचे दर ठरविणे व ॲगमार्क किंवा प्रतवार केलेल्या शेतीमालाच्या विक्रीस प्राधान्य देणे.

४) नियमातील तरतुदीनुसार शेतीमालाच्या विक्रीची पद्धत, वजनमापाचे परिमाण.

५) शेतीमालाच्या विक्रीचा हिशोब देण्याची पद्धत.

६) शेतीमालासंबंधी निर्माण झालेल्या विक्री, वजन अगर मोजमाप, बटवडा हिशेब व इतर तत्संबंधीत बाबींचा वांधा मिटविणे.

७) अडत्या, व्यापारी, दलाल तोलणार, मापणार व इतर अनुज्ञप्तिधारी यांचेकडून निरनिराळ्या प्रकारची नित्य व नैमित्तिक माहितीपत्रके बाजार समितीला सादर करणे.

८) वजनमाप, मोजमापाच्या पद्धती व पुस्तके, प्रतींची संख्या व त्याचे निरनिराळ्या घटकांना वाटप.

९) अडत्या, व्यापारी, दलाल, तोलणार, मापणार, सर्वेक्षक वखारवाला, हमाल व मालधनी व बाजाराचे इतर संबंधीत घटक यांची पात्रता व त्यांची कर्तव्ये.

१०) बाजार आणि बाजार क्षेत्रातील व्यवहाराचे ठिकाण वापरण्याबाबत नियम, अटी, किंमत, भाडे वगैरे.

११) बाजार आवारात येण्या-जाण्याबद्दल तसेच वाहने उभी करण्यासंबंधी मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईच्या घोषित बाजार आवारात येणाऱ्या प्रत्येक वाहनावर खालीलप्रमाणे प्रवेश शुल्क

आकारण्यात येईल.

| | | दैनंदिन | मासिक | वार्षिक |
|---|---|---|---|---|
| १. | भरलेला ट्रक | रू. २५/- | | |
| २. | रिकामा ट्रक | रू. १५/- | | |
| ३. | भरलेला टेम्पो | रू. १५/- | | |
| ४. | रिकामा टेम्पो | रू. १०/- | | |
| ५. | अन्य वाहने | रू. ५/- | | |

प्रवेश शुल्क आकारणीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार बाजार समितीस राहतील. अनुज्ञप्तिधारक वाहतूकदाराकडून बाजारसमिती वेळोवेळी जे प्रवेश शुल्क ठरवेल ते त्यांना द्यावे लागले.

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीने नियमनाखाली आणलेल्या शेतमालाच्या विक्रीचा व्यवहार बाजार समितीच्या बाजार क्षेत्रातील घोषित बाजार आवारांव्यतिरिक्त कुठेही करता येणार नाही.

## १२. काटा शुल्क (नवीन)

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईने वजनकाट्याची सुविधा करून दिलेली असल्याने सदर सुविधेचा फायदा घेणा-या प्रत्येक वाहनांकडून खालीलप्रमाणे काटा शुल्क आकारले जाईल.

| | | |
|---|---|---|
| १. | ट्रक | रू. १५/- |
| २. | टेम्पो | रू. १०/- |
| १. | अन्य वाहने | रू. ५/- |

४९. बाजार समितीच्या योग्य परवान्याशिवाय कुणालाही वजनाने १ मेट्रीक टनापेक्षा जास्त कांदा अगर बटाटा मुंबई बाजार क्षेत्रामध्ये तुर्भे वाशी येथील बाजार आवारा व्यतिरिक्त आणि मध्य रेल्वेच्या नव्या मुलुंड मालधक्क्याव्यतिरिक्त अगर मुलुंडच्या उत्तरेस कोणत्याही स्टेशना व्यतिरिक्त अगर पश्चिम रेल्वेच्या बोरीवली स्टेशनाच्या व्यतिरिक्त इतर कोठेही कुठल्याही पद्धतीने वाहतूक करून पाठवता येणार नाही. वरील नियम रेल्वेने २८ जानेवारी १९७९ पूर्वी पाठविलेल्या मालास लागू पडणारा नाही.

५०. बाजार क्षेत्रात प्रवेश करणा-या व बाहेर जाणा-या कोणत्याही वाहनास बाजार क्षेत्रात कोणत्याही ठिकाणी थांबविण्याचा व त्यातील माल वस्तू तपासण्याचा तसेच त्यासंबंधी संबंधित वाहन चालकाकडून/मालधन्याकडून योग्य ते स्पष्टीकरण मागवण्याचा अधिकार बाजार समितीच्या अधिकृत इसमास असेल. असा माल घेऊन जाणा-या वाहनातील मालाची विक्री बाजार समितीच्या आवारात झाली नसल्याची खात्री झाल्यास तो माल सक्तीने उतरवून त्याची विक्री करण्यासाठी भाग पाडण्यात येईल. मात्र असा माल घेऊन येणा-या वाहनातील माल हा शासकीय संस्था, निमशासकीय संस्था सहकारी संस्था, कंपनी कायद्याखाली रजिस्टर्ड झालेल्या कंपन्या, हॉटेल, हॉस्पीटल, लष्कर, ट्रस्ट,

निर्यातदार, प्रक्रिया करणारे तसेच थेट ग्राहकांना वितरीत करण्यासाठी घेऊन जात असल्याची खात्री झाल्यास तो माल विक्री न करता बाजार समितीच्या पुर्वपरवानगीने बृहन्मुंबईत पाठविता येईल. अशा मालावर त्या दिवशी कृषि उत्पन्नाचा जो सरासरी दर असेल त्या दराने बाजार फी देखरेख फी इत्यादी आकार ठरवून दिलेल्या दरानुसार वाहन चालक/मालधन्यास देणे बंधनकारक राहील.

५१. मुंबई बाजार क्षेत्रात नियमन केलेल्या व वेळोवेळी नियमनाखाली येणाऱ्या शेतमालाची वाहतूक तपासण्याकरिता खाली दर्शविलेल्या ठिकाणी तपासणी नाके (चेक पोस्ट) असतील.

१. महानगरपालिका नाका, दहीसर
२. महानगरपालिका नाका, मुलुंड आग्रा रोड
३. महानगरपालिका नाका, ठाणे
४. तुर्भे वाशी नाका
५. मुलुंड रेल्वे यार्डवरून येणारा रस्ता व पूर्व द्रुत महामार्ग एकत्र येणारे ठिकाण.
६. बाळ राजेश्वर चेक नाका, मुलुंड पश्चिम.

अ. सदर तपासणी नाक्यावरून नियमनाखालील शेतमाल घेऊन बृहन्मुंबईत प्रवेश करणाऱ्याकडे बाजार समितीने ठरवून दिलेल्या नमुन्यात आवश्यक तो 'प्रवेश परवाना' नसेल तर असा शेतमाल घेऊन जाणाऱ्या वाहनचालकांना तुर्भे येथील घोषित बाजारात सदर वाहन मालासह घेऊन जाण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार बाजार समितीच्या अधिकृत कर्मचाऱ्याला असेल. असा माल घेऊन येणारे वाहन तुर्भे येथे आल्यानंतर त्याची रितसर चौकशी करून निर्णय देण्याचा अधिकार बाजार समितीच्या सहाय्यक सचिव अथवा त्यांचे वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याला असेल.

५२. तुर्भे बाजार आवारात प्रवेश करताना संबंधीत वाहनाच्या चालकाने मालधन्याने वाहनात असलेल्या मालासंबंधीचा इनव्हॉइस अगर संबंधीत माहिती बाजार समितीच्या अधिकृत इसमास दाखविली पाहीजे, सदर इसम परिशिष्ट क्र. १९ मध्ये लागणारी जरूर ती माहिती घेऊन सदर इन्व्हॉइसवर बाजार समितीचा शिक्का मारून सही केल्यानंतर वाहनास बाजार आवारात प्रवेश करण्यात परवानगी येईल.

५३. तुर्भे बाजार आवाराच्या बाहेर जाणाऱ्या वाहनातील माल निर्गमन द्वारावर तपासून बाजार समितीचा अधिकृत इसम या संबंधीच्या फाटापट्ट्या पहून परिशिष्ट क्र. २० मध्ये लागणारी माहिती घेईल व त्याचे बाबतीत संपूर्ण समाधान झाल्यानंतर परिशिष्ट क्र. २१ मध्ये दर्शविलेल्या नमुन्यात बृहन्मुंबईत प्रवेश करण्याचा परवाना देईल. अशा प्रकारचा परवाना देण्याचा अधिकार तपासणी नाक्यावर नियुक्त केलेल्या बाजार समितीच्या अधिकृत इसमासही असेल. असा परवाना असल्याशिवाय कोणत्याही वाहनास शेतीमाल घेऊन बृहन्मुंबईत प्रवेशकरता येणार नाही.

५४. तरतूद वगळण्यात यावी.

५५. या उपविधीमध्ये आणि अथवा बाजार समिती व व्यापारी /अडते तसेच बाजारातील इतर घटक यांच्यामध्ये केलेल्या कुठल्याही करारात काहीही उल्लेख असला तरी गाळा, दुकान, जागा, गोदामधारकांच्या बाबतीत बाजार समितीच्या खालीलपैकी एक अथवा एकापेक्षा जास्त बाबी निदर्शनास आल्यास बाजार समितीने गाळाधारकांना दिलेला गाळा, दुकान, जागा, आणि/अथवा गोदाम भाडेपट्ट्याने (लिजवर) देण्यात आलेल्या कराराची मुदत संपण्यापूर्वी अगर संपल्यानंतर देखील ताब्यात घेण्याचा अधिकार बाजार समितीला असेल.

१. गाळा/दुकान/जागा/गोदामधारक हे स्वतः बाजार समितीचे अनुज्ञप्तिधारक नसल्यास.

२. गाळा/दुकान/जागा/गोदाम ज्या कारणासाठी देण्यात आले आहे, त्याच कारणासाठी त्याचा वापर ताबा दिल्यापासून ६ महिन्याचे आत किंवा बाजार समितीने वेळोवेळी वाढवून दिलेल्या मुदतीत विहीत कारणासाठी वापर न केल्यास अथवा त्याचा गैर वापर होत असल्यास.

३. यासंबंधी करण्यात आलेल्या करारातील कुठल्याही अटींचा भंग करून ही गाळा/दुकान/जागा/गोदाम ताब्यात असल्यास / ठेवल्यास.

४. बाजार समितीला बाधक / अपायकारक असे कारण गाळा/दुकान/जागा/गोदामधारकांकडून घडल्यास.

## मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीची मापाडी म्हणून अनुज्ञप्ति मागणी करणाऱ्या अर्जदाराची पात्रता व त्यांच्या कर्तव्ये याबाबत उपविधी क्रमांक ४८ (९) खालील केलेले उपनियम

१. मापाडीची अनुज्ञप्ति मिळणेसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तिचे वय कमीत कमी १८ वर्ष पूर्ण व जास्तीत जास्त ३० वर्षापेक्षा अधिक नसावे मात्र अनुसूचित जाती जमातीचे अर्जदाराचे बाबतीत वय ३५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

२. मापाडीची अनुज्ञप्तिसाठी अर्ज करणारी व्यक्ति कमीत कमी प्राथमिक शाळा प्रमाणपत्र इयत्ता ७वी किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण झालेली असावी.

३. अर्जदाराने मापाडीची अनुज्ञप्ति मिळणेसाठी केलेल्या अर्जासोबत शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती व चांगल्या वर्तणुकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचे राजपत्रीत अधिकारी, नगरसेवक अथवा ग्रामपंचायतीचे सरपंच यांचा दाखला जोडला पाहीजे.

४. अर्जदारास मापाडीची अनुज्ञप्ति मंजुर करून दिल्यानंतर एक वर्षाचे कालावधीत त्याचे कामकाज समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास त्याच्या अनुज्ञप्तिचे नुतनीकरण केले जाणार नाही.

५. मापाडी अनुज्ञप्ति धारकाचे वय ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर त्याच्या अनुज्ञप्तिचे नुतनीकरण केले जाणार नाही.

६. मापाडी अनुज्ञप्ति धारकास या बाजार समितीशिवाय इतर कोणत्याही बाजार समितीची मापाडी अथवा कोणतीही अनुज्ञप्ति धारण करता येणार नाही. तसेच त्यास कोणतीही खाजगी अर्धवेळ वा पूर्णवेळ नोकरी करता येणार नाही. तसे बाजार समितीस आढळून आल्यास त्यास बाजार समितीने दिलेली अनुज्ञप्ति रद्द करण्यात येईल.

७. बाजार समितीची मापाडी म्हणून अनुज्ञप्ति धारण करणारी व्यक्ति याच बाजार समितीच्या अनुज्ञप्तिधारक आडते अथवा खरेदीदार व्यापारी यांच्या कुटुंबातील नसावी.

८. बाजार समितीची मापाडी अनुज्ञप्ति धारण करणाऱ्या व्यक्तीस या बाजार क्षेत्रात नियमन केलेल्या शेतीमालाच्या खरेदी विक्री तथा अडतीचा व्यवहार करता येणार नाही.

९. अनुज्ञप्ति धारक मापाडीने बाजार समितीचे अधिकारी कर्मचारी सूचना देतील त्यानुसार मापाईचे तोलाईचे काम केले पाहिजे व दररोज काम संपल्यावर तोलाई पत्रके कार्यालयात सादर केली पाहीजेत.

१०. अनुज्ञप्ति धारक मापाडीने कामावर असताना कोणताही मादक पदार्थ/पेय/सेवन करू नये.

११. अनुज्ञप्ति धारक मापाडीने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील सन १९६७ चे नियम व बाजार समितीचे उपविधी यातील तरतुदीचे पालन केले पाहीजे.

१२. अनुज्ञप्ति धारक मापाडीस बाजार समितीला १५ दिवसाची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय संपावर जाता येणार नाही.

१३. वरील उपनियमांचा भंग करणाऱ्या मापाडीची अनुज्ञप्ति रद्द अथवा निलंबीत करण्याचा अधिकार बाजार समितीचे सचिव/सभापती यांना राहील.

१४. नियमन कार्याचे सोईसाठी आवश्यक तेवढ्या मापाडीची संख्या ठरविणे व त्यांना अनुज्ञप्ती देणे बाबतचे संपूर्ण अधिकार बाजार समितीस राहतील.

५६. बाजार समितीने विकसीत केलेल्या बाजार आवारातील गाळ्यांच्या, सार्वजनिक जागेचा गैरवापर अथवा दुरूपयोग केल्यास जास्तीत जास्त रू. १०,०००/- पर्यंत दंड आकारण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.